# सहसंचालक तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालय,

शासकीय तंत्र निकेतन परिसर, गाडगे नगर, अमरावती ४४४ ६०३

E-mail:-roamravati@dtemaharashtra.gov.in Ph.No. :(०७२१) २५७३०२७, २५७२५७७

Website: www.jdroamt.org Fax No. : (०७२१) २५७ ७९१३


क्रमांक :- विक्राअ/शिक्षण/ईबीसी/२०१८/ 1906

दिनांक :- 02 AUG 2018

प्रति,

**प्राचार्य,**

सर्व पदविका/पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम

चालविणा-या संस्था,

अमरावती विभाग, अमरावती.

**विषय :- आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांकडून प्रवेशाच्या वेळी पात्र विद्यार्थ्यांच्या हिश्याची शिक्षण शुल्काची ५० टक्के रक्कम शिक्षण संस्थांनी न घेण्याबाबत.**

**संदर्भ :-** मा.अवरसचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे शासन परीपत्रक क्रमांक :- ईबीसी २०१८/प्र.क्र.३८/तांशि ४ दिनांक १४ फेब्रुवारी २०१८.

उपरोक्त विषयाबाबत आपणास कळविण्यात येते की, सोबत मा.अवरसचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे **आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांकडून प्रवेशाच्या वेळी पात्र विद्यार्थ्यांच्या हिश्याची शिक्षण शुल्काची ५० टक्के रक्कम शिक्षण संस्थांनी न घेण्याबाबत** शासन परीपत्रक जोडलेले आहे. कृपया त्याचे अवलोकन करुन त्याप्रमाणे आपल्या स्तरावर कार्यवाही करावी. याबाबत तक्रार प्राप्त होणार नाही, याची दक्षता घ्यावी.

**(डॉ. डी.व्ही. जाधव)**

सहसंचालक तंत्रशिक्षण,

अमरावती.

प्रत :- प्रोग्रामर, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती यांना संकेतस्थळावर प्रदर्शित करण्यासाठी.

आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांकडून प्रवेशाच्या वेळी पात्र विद्यार्थ्यांच्या हिश्श्याची शिक्षण शुल्काची ५० टक्के रक्कम शिक्षण संस्थांनी न घेण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
शासन परिपत्रक क्र.इबीसी-२०१८/प्र.क्र.३८/तांशि-४
मंत्रालय विस्तार भवन, मादाम कामा मार्ग,
हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई .४०००३२
दिनांक : १४ फेब्रुवारी, २०१८

परिपत्रक :

उच्च व तंत्र शिक्षण विभागांतर्गत तं. शिक्षण संचालनालय, उच्च शिक्षण संचालनालय व कला संचालनालय यांच्या अखत्यारितील विविध मान्यताप्राप्त अभ्यासक्रमांना केंद्रीभूत प्रवेश पध्दतीने / विहित पध्दतीने प्रवेश घेणाऱ्या आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील पात्र विद्यार्थ्यांना राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजनेंतर्गत ५० टक्के शिक्षण शुल्काची प्रतिपूर्ती शासनाकडून करण्यात येते. शैक्षणिक वर्ष २०१७-१८ पासून सदर ५० टक्के शिक्षण शुल्काची प्रतिपूर्तीची रक्कम पात्र विद्यार्थ्यांच्या बँक खात्यात थेट जमा करण्यात येणार आहे.

२. राज्यातील बऱ्याचशा शिक्षण संस्था आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांना प्रवेश देताना प्रवेशाच्यावेळी १०० टक्के शिक्षण शुल्क भरण्याचा आग्रह धरतात किंबहुना १०० टक्के शिक्षण शुल्क भरल्याशिवाय विद्यार्थ्यांना प्रवेश देत नाहीत, अशा तक्रारी विद्यार्थ्यांकडून, पालकांकडून, विविध संघटनांकडून तसेच लोकप्रतिनिधींकडून शासनाकडे वारंवार प्राप्त होत असतात. वास्तविक प्रवेशाच्यावेळी अशा विद्यार्थ्यांकडून फक्त त्यांच्या हिश्श्याची ५० टक्के रक्कम शिक्षण संस्थांनी घेणे अपेक्षित आहे. उर्वरित ५० टक्के रक्कम शासनाकडून शिष्यवृत्तीच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या बँक खात्यात थेट जमा करण्यात येणार आहे व तद्नंतर विद्यार्थ्यांनी ती शिक्षण संस्थांमध्ये भरणे आवश्यक आहे. याअनुषंगाने याव्दारे सूचित करण्यात येते की, सर्व संबंधीत शिक्षण संस्थांनी आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांना प्रवेश देताना पात्र विद्यार्थ्यांकडून प्रवेशाच्यावेळी शिक्षण शुल्काची १०० टक्के रक्कम अथवा पूर्ण रक्कम विद्यार्थ्यांनी भरावी असा आग्रह धरु नये. आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील ज्या विद्यार्थ्यांना १०० टक्के शिक्षण शुल्क प्रतिपूर्ती अनुज्ञेय आहे, त्या पात्र विद्यार्थ्यांकडून प्रवेशाच्यावेळी शिक्षण शुल्काची रक्कम भरण्याचा आग्रह करण्यात येऊ नये. तसेच ज्या विद्यार्थ्यांना ५० टक्के शिक्षण शुल्क प्रतिपूर्ती अनुज्ञेय आहे, त्या पात्र विद्यार्थ्यांनी प्रवेश घेताना ५० टक्के शिक्षण शुल्क भरल्यास त्यांना प्रवेश

देणे क्रमप्राप्त आहे. अशा पध्दतीने शिक्षण संस्थांनी आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील पात्र विद्यार्थ्यांकडून प्रवेशाच्यावेळी शिक्षण शुल्काची संपूर्ण रक्कम भरावी असा आग्रह धरल्यास किंवा मागणी केल्यास अशा संस्थांविरुध्द कारवाई करण्यात येईल, अशा सक्त सूचना याव्दारे देण्यात येत आहेत. ही बाब संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, संचालक, उच्च शिक्षण संचालनालय व संचालक, कला संचालनालय यांनी त्यांच्या नियंत्रणाखालील सर्व शिक्षण संस्थांच्या करतांना निदर्शनास आणावी. याउपर अशा प्रकारची तक्रार प्राप्त झाल्यास संबंधीत संस्थांना समज द्यावी व आवश्यकता वाटल्यास संस्थांविरुध्द कारवाई करावी.

३. सदर परिपत्रकास सर्व प्रसिध्दी माध्यमांव्दारे संबंधीत संचालकांनी प्रसिध्दी द्यावी. संबंधित संचालनालयांच्या संकेत स्थळांवर हे परिपत्रक जाहिर करावे.

४. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१८०२१४१३११५५५७१८ असा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Madan Maruti Morve

( म.मा.मोरवे )

अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई
२. संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे
३. संचालक, कला संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई
४. आयुक्त, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, महाराष्ट्र राज्य, ३०५, शासकीय तंत्रनिकेतन इमारत, ४९, खेरवाडी, अलियावर जंग मार्ग, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०००५१
६. सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, ३०५, शासकीय तंत्रनिकेतन इमारत, ४९,खेरवाडी, अलियावर जंग मार्ग,वांद्रे (पूर्व), मुंबई-४०००५१
७. सचिव, शुल्क नियामक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, ३०५, शासकीय तंत्रनिकेतन इमारत, ४९,खेरवाडी,अलियावर जंग मार्ग,वांद्रे (पूर्व), मुंबई-४०००५१
८. सर्व सहसंचालक, तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालये
९. सर्व सहसंचालक, उच्च शिक्षण, विभागीय कार्यालये

१०. सर्व सहसंचालक, कला संचालनालय विभागीय कार्यालये

११. सर्व सहसचिव/उपसचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई

१२. सर्व अवर सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई

१३. सर्व कक्ष अधिकारी, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई

१४. मा.मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण यांचे विशेष कार्य अधिकारी,

१५. मा.राज्यमंत्री, उच्च व तंत्र शिक्षण यांचे खाजगी सचिव,

१६. निवड नस्ती (तांशि-४)